Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १३८ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१७ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# अजित पवार गट हा मूळ राष्ट्रवादी पक्ष ; विधानसभा अध्यक्षांचा निकाल

**मुंबई–**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदार अपात्र प्रकरणी विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज पाच याचिकांवर निर्णय दिला. रद पवार गटाकडून तीन तर अजित पवार गटाकडून दोन याचिका सादर करण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या निकषांवरून पक्षाची राज्यघटना, पक्षाचं नेतृत्व आणि पक्षाचा विधिमंडळ गट यावरून यासंदर्भातला निर्णय घेतला गेला असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा हे ठरवताना विधिमंडळ बहुमताचा विचार करावा लागेल. अजित पवार गटाकडे ५३ पैकी ४१ आमदार आहेत. या बहुमताला शरद पवार गटाने आव्हान दिलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजित पवार यांचाच आहे. त्यामुळे अजित पवार गटाला विधिमंडळ पक्षाचा पाठिंबा आहे. नेतृत्व संरचना किंवा पक्ष संघटनेवरून कोणता गट पक्ष आहे हे निश्चित होत नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षाच्या संख्याबळानुसार अजित पवार गट खरा राष्ट्रवादी पक्ष असल्याच्या निष्कर्षावर मी आलो असल्याचे राहुल नार्वेकर यांनी सांगितले.विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कोणतीही फूट पडलेली नाही. तर दोन गट तयार झाले आहेत. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी पक्षाध्यक्षपदावर दावा केला आहे. तसेच पक्षाध्यक्षपदी आता जे आहेत, त्यांची निवड योग्य प्रक्रियेनुसार झाली नसल्याचाही दावा दोन्ही गटाकडून करण्यात आला आहे. ३० जून २०२३ रोजी अजित पवारांना पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्त करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. शरद पवार गटाने या प्रक्रियेला विरोध केला. त्यातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्याचे ३० जून रोजीच स्पष्ट झाले. अजित पवारांची निवडणूक पक्षघटनेच्या विरोधी आहे असा दावा शरद पवार गटाने केला आहे. पक्षाचा अध्यक्ष कोण आहे? हे मी ठरवू शकत नाही, अशी माहिती राहुल नार्वेकर यांनी दिली.शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी घेताना विधानसभा अध्यक्षांना १५ फेब्रुवारीपर्यंत आमदार अपात्रतेप्रकरणी निकाल देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ३१ ऑक्टोबरच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ३१ जानेवारीपर्यंत निकाल देण्याचे आदेश होते. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकरांच्या वकिलांच्या विनंतीनुसार १५ दिवसांची मुदतवाढ दिली होती.




# 3 लाख ८० हजार रूपयाचा देशी दारू सह मुद्देमाल जप्त

## अहेरी पोलिस स्टेशनची मोठी कारवाई

**अहेरी । प्रतिनिधी**

१६ फेबूरवारी रोजी दुपारी ३ वाजताचे सुमारास अहेरी वरून आलापल्ली मार्गानी एटापल्ली कडे जाणारी चारचाकी पीकअप वाहन क्रमांक ची एमएच ३४ एव्हि २०७९ या वाहनाने देशी दारूची तस्करी करीत असल्याची माहीती मिळाल्याने पोलीस पथकाने मौजा आलापल्ली–एटापल्ली रोड येथे सापळा रचुन सदर वाहनास थांबवून सदर वाहणाची पंचा समक्ष पाहणी केली असता सदर वाहनाच्या डाल्यामध्ये खाकी रंगाच्या बॉक्समध्ये रॉकेट देशी दारू संत्रा प्रवरा डिस्टिलरी प्रवरानगर असे लिहीलेले किंमत २ लाख ८० हजार रूपये किमतीच्या दारू व १,लाख किमतीचे चारचाकी पिकअप वाहन असा एकुन ३लाख ८० हजार किमतीचा मुद्देमाल मिळुन जप्त करण्यात आल्याने पोस्टे अहेरी यांनी गुन्हा नोंद करून तपासात घेतला आहे.सदर गुन्हयाच्या तपास पोहवा सत्यमकुमार लोहबरे पोस्टे अहेरी हे करीत आहे.सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक निलोत्पल ,अप्पर पोलीस अधीक्षक एम रमेशकुमार,अप्पर पोलीस अधीक्षक यतीश देशमुख,उपविभागीय पोलीस अधीकारी अजय कोकाटे स यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज काळबांधे पोलिस स्टेशन अहेरी यांच्या नेतृत्वात पोहवा मनोज शेन्डे, पोना हेमराज वाचाडे, पोशी आशीष भारतसागर, पोशी शंकर दहीफळे पोस्टे अहेरी यांनी पार पाडली.




# वारली चित्रातून केल्या अंध शाळेच्या भिंती बोलक्या

## कलाशिक्षक परमानंद तिराणिक यांचा उपक्रम

**वरोरा । प्रतिनिधी**

आनंदवन येथील अंध शाळेत इयत्ता ६ वीच्या पाठ्यक्रमात असलेल्या नवव्या प्रकरणातील ' वारली चित्रकला हा प्रत्यक्षात अंध विद्यार्थ्यांना कसा अनुभवता येईल म्हणून ' माझी शाळा,माझा उपक्रम' या विषयावर आधारित महाराष्ट्राची संस्कृती आमची शान या संकल्पनेवर अनूसरून आदिवासी वारली चित्रकलेचा समृद्ध वारसा जोपासण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. आचार्य पुरस्कार प्राप्त तथा राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार प्राप्त कलाशिक्षक परमानंद तिराणिक यांनी स्वतः हे वारली चित्रे शाळेच्या समोरील मोकळ्या भिंतीवर अंशतः अंध असणाऱ्या विद्यार्थ्यांसह डोळस विद्यार्थ्यांच्या समवेत संपूर्ण भिंतीवर अतिशय देखण्या स्वरूपात वारली चित्रे रेखाटुन अंध शाळेच्या भिंती बोलक्या केल्या.

या चिंत्रामध्ये पर्यावरण संकल्पनेवर पाठ्यातील परिसंस्था, वाळवंट, जंगली प्राणी,आजुबाजुच्या परिसरातील पशुपक्षी, वृक्षवेली, नदीनाले, डोंगर पहाड, वने, नृत्ये, घरदार , शेतीचे हंगाम, शिवारे इत्यादी अनेक विषयांना धरून भिंतीवर चित्रे रेखाटली गेली. चित्रे रेखाटतांना प्रामुख्याने वर्तुळ, त्रिकोण, चौरस यांसारख्या भौमितीय आकारांचा वापर केला गेला. संस्थेचे विश्वस्त सुधाकर कडु यांनी या उपक्रमाचे कौतुक करून या कलेला त्यांनी प्रोत्साहन देऊन अंध विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविले. शाळेचे मुख्याध्यापक सेवकराम बांगडकर यांच्यासह शाळेच्या शिक्षिका तनुजा सव्वाशेरे, भावेश बाथम, आशीष गेडाम, मोहीत धोटे, अनिकेत घोसले या विद्यार्थ्यांसह समिधा बांगडकर, मेंढे आदींनी या उपक्रमात सहभाग नोंदविला, यशस्वीतेसाठी जितेंद्र चुदरी , किशोर घोडाम, विलास कावणपुरे, साधना माटे, वर्षा उईके, माला भट, कृष्णा डोंगरवार, यांचे सहकार्य लाभले..



# खेळामुळे सांधिक भावना वाढीस लागते : म्युझिकल मोटिव्हेशनल स्पीकर व आयफा पुरस्कार विजेते कैलाश तानकर

## गोंडवाना विद्यापीठात तीन दिवसीय अमृत क्रीडा व कला महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

क्रीडा आणि कलेला दैनंदिन जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे आपल आयुष्य घडत असून कामातील ताण कमी होत असतो . आपल्यातील कलेला प्रोत्साहन दिल्यामुळे आपण कसं घडत जातो हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन समजावून सांगितलं. खेळामुळे सांघिक भावना वाढीस लागते असे मत म्युझिकल मोटिव्हेशनल स्पीकर आयफा पुरस्कार विजेते तसेच निवृत्त पोलिस अधिकारी कैलाश तानकर यांनी व्यक्त केले.अमृत क्रीडा व कला महोत्सवाचे उद्घाटन १६ फेब्रुवारीला गोंडवाना विद्यापीठात पार पडले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंचावर ज्येष्ठ कलावंत नाटककार व दिग्दर्शक विरेंद्र गणवीर ,अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण , वित्त व लेखाधिकारी सी. ए.भास्कर पठारे ,संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. अनिता लोखंडे, संचालक विद्यार्थी विकास डॉ. प्रिया गेडाम, अनुप ढोरे , सिनेट सदस्य तसेच कर्मचारी संघटनेचे सचिव सतीश पडोळे, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष मनोज जाधव, चंद्रपूर- गडचिरोली जिल्हा महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना प्रशांत रंदई, महासचिव अरुण जुनघरे आदी उपस्थित होते . या प्रसंगी ज्येष्ठ कलावंत , नाटककार व दिग्दर्शक विरेंद्र गणवीर म्हणाले, झाडीपट्टी रंगभूमीने अनेक कलावंत दिले आहे. झाडेपट्टी रंगभूमीचीउलाढाल लाखोंच्या घरात आहे. गडचिरोली जिल्हा हा कलेने समृद्ध आहे. कलेच्या माध्यमातून नवीन संस्कृती निर्माण होत असते त्यामुळे आपलीकला ही टिकवली पाहिजे आणि त्याचा वसा हा येणाऱ्या पिढीकडे दिला पाहिजे असे ते म्हणाले, अध्यक्षीय स्थानावरून बोलताना डॉ. अनिल हिरेखण म्हणाले, कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यापीठाने हा अमृतचा मंच उपलब्ध करून दिलेला आहे . कामाच्या व्यस्ततेतही आपल्यातील कला जपून ती वृद्धींगत केली पाहिजे.त्यामुळे कामाचा ताण कमी होतो. प्रत्येकामध्येच राजहंस दडलेला असतो.असे ते म्हणाले. यावेळी म्युझिकल मोटिव्हेशनल स्पीकर व आयफा पुरस्कार विजेते कैलाश तानकर, आणि कुलसचिव डॉ.अनिल हिरेखण यांनी उपस्थित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आग्राहास्तव गीत गाऊन उपस्थितांची मने जिंकली. या महोत्सवात चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील सलंग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले आहेत. प्रास्ताविक संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. अनिता लोखंडे, संचालन मराठीचे विभागाचे स. प्रा. डॉ. हेमराज निखाडे, आभार, संचालक विद्यार्थी विकास डॉ.प्रिया गेडाम यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# अखेर पिपरबोडी येथे ग्रामस्थांनी घेतला दारुबंदीचा निर्णय

## हनुमान मंदिर देवस्थान व चिनोरा तंटामुक्त समितीचा पुढाकार



**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या चिनोरा (पारधी टोला) पिपरबोडी येथे अखेर ग्रामस्थांनी दारूबंदी चा एकमताने निर्णय घेतला आहे. चिनोरा ग्रामपंचायत अंतर्गत पारधी टोला पिपरबोडी हे लहानसे गाव आहे. जेमतेम गावची तिनसे लोकसंख्या , परंतु चार चार घरी दारु विक्री, यातच किशोर वयातील मुले दारूच्या आहारी गेले. गावातील महिला दारूड्या पतीच्या त्रासापायी कंटाळलेल्या होत्या.

श्री हनुमान मंदिर देवस्थान कमेटिच्या पदाधिकाऱ्यांनी दारु विक्रेत्यांना एका महिन्या अगोदर दारूबंदी बाबत सुचनाही दिल्या होत्या. अनेकदा आपआपसात भांडण तंटे व्हायचे पोलिस स्टेशन कोर्ट कचेरी च्या चकरा व्हायच्या, दिनांक १६ फेब्रुवारी ला हनुमान देवस्थानचे पदाधिकारी, चिनोरा महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन गावातील चौकात सभा बोलावली.दारू विक्री या नंतर करू नये. केल्यास पोलीसांना तक्रार देण्यात येईल अशी दारूविक्रेत्यांना तंबी देण्यात आली.यानंतर गावात दारू आम्ही विकणार नसल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.सभेला आदिवासी पारधी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष धर्मेंद्र शेरकुरे,चिनोरा तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्ष सुशिला तेलमोरे, सदस्य गजानन भोयर, त्रिशुल निबुधे, श्री हनुमान मंदिर देवस्थान चे अध्यक्ष रवींद्र शेरकुरे, उपाध्यक्ष नेपाल शेरकुरे,वामण नन्नावरे,सदाशिव नन्नावरे, दिवाकर नन्नावरे, राजेश्वर नन्नावरे, प्रमोद घोसरे ,वामण नन्नावरे, प्रवीण नन्नावरे, अमोल घोसरे,व गावातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची लूट करणाऱ्या धानखरेदी केंद्रावर गुन्हे दाखल करा–सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार

**गडचिरोली । प्रतिनिधी**

४० किलो ६०० ग्रॅम प्रती गोणी वजनाप्रमाणे धान खरेदी करण्याचे शासनाचे धोरण असतांना ओलाव्याच्या नावाखाली ४२ ते ४३ किलोची खरेदी करून जिल्हाभरातील खरेदी केंद्रांवर ८ कोटी रुपयांपेक्षा अधिकची लुट शेतकऱ्यांकडून करण्यात आली असून शेतकऱ्यांना लुटणाऱ्यांविरोधात शहानिशा करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ताटीकोंडावार यांनी केली आहे.

पोलिसात केलेल्या तक्रारीत ताटीकोंडावार यांनी म्हटले आहे की, शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी विकास महामंडळ आणि मार्केटिंग फेडरेशन मार्फत शेतकऱ्याकडून धान खरेदी करण्यात येते. सध्या आदिवासी विकास महामंडळाचे ९३ आणि मार्केटिंग फेडरेशनचे २१ असे साधारणतः ११४ खरेदी केंद्रांवर ही धान खरेदी सुरु असून आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करुन लुट करण्यात येत आहे. शासन नियमा प्रमाणे खरेतर एका गोणी (पोते) मध्ये ४० किलो ६०० ग्रॅम वजनापेक्षा अधिक धानाची खरेदी करता येत नाही. मात्र जिल्हाभरातील सर्व धान खरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांकडून ४२ ते ४३ किलो प्रती गोणी (पोते) वजनाने शेतकऱ्यांकडून धान खरेदी करण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.सदरच्या प्रकाराबद्दल शेतकरी जेव्हा विचारणा करतात तेव्हा, हे अधिकचे वजन ओलाव्याचे म्हणून घेण्यात येत आहेत असे उत्तर दिले जात आहेत. मात्र एका गोणी (पोते) मध्ये ४० किलो ६०० ग्रॅम वजनातून शासन खरेदी केंद्र किंवा अभिकर्ता संस्थांकडून ओलाव्याची तुट गृहित धरुन ३८ किलो ५०० ग्रॅम वजन धानाचीच उचल करीत असल्याने शेतकऱ्यांकडून ४२ ते ४३ किलो प्रती गोणी (पोते) वजनाने केली जात असलेली खरेदी ही शुध्द लुट आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १० लाख क्विंटलपेक्षा अधिकची धान खरेदी करण्यात आलेली असून यातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ८ कोटीपेक्षा जास्त रुपयांची खरेदी केंद्रांवर अधिकचा धान प्रति पोत्यामागे घेवून लुट करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक खरेदी केंद्रांवर आपली खास पथके पाठवून व पोत्यांमध्ये खरेदी केलेल्या धानाच्या वजनाची तपासणी केली असता ४१. ९०० ४२.२५० आढळून आले या महालुटीची शहानिशा बाबत तक्रार करण्यात आली व दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येवून अधिकच्या खरेदीची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी अशी मागणीही सामाजिक कार्यकर्ते संतोष ताटीकोंडावार यांनी केली त्यावेळी मने राजाराम येथील सरपंच शारदा कोरेत इंदरशाह मडावी ,पोलीस पाटील कृष्णा सेडम उपस्थित होते आहे.



**शेतकऱ्यांची केली ८ कोटीने लूट**

आतापर्यंत जिल्ह्यात १० लाख क्विंटलपेक्षा अधिकची धान खरेदी करण्यात आलेली असून यातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ८ कोटी रुपयापेक्षा जास्त लुट करण्यात आली असल्याचा आरोप ताटीकोंडावार यांनी तक्रारीत केला आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे ऑगस्टपर्यंत पूर्ण करा-पालकमंत्री राठोड

## पोहरादेवी व उमरी येथील विकासकामांचा आढावा;मंत्री, खासदारांकडून कामाचे कौतुक

**वाशिम**– श्रीक्षेत्र पोहरादेवी येथील श्री संत सेवालाल महाराज तीर्थक्षेत्र विकास आराखडा आणि उमरी व पोहरादेवी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे ागस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी आज प्रशासनाला दिले.



तीर्थक्षेत्र पोहरादेवी व उमरी येथे सुरु असलेल्या शासनाच्या विविध विकासकामांसंदर्भात पालकमंत्री संजय राठोड यांनी नंगारा भवनातील सभागृहात आढावा घेतला. यावेळी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर जिल्हाधिकारी शहाजी पवार, अधीक्षक अभियंता अविनाश धोंडगे, विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.तीर्थक्षेत्र पोहरादेवी व उमरी येथे सुरु असलेल्या विकासकामांचे आणि नंगारा भवन बांधकामाच्या प्रगतीचे कौतुक करण्यात आले. या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे तसेच नंगारा भवनाचे काम लवकरात लवकर पूर्ण झाले पाहिजे. राज्य सरकारने सुमारे सव्वा सातशे कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. या कामांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जाईल, असे निर्देश पालकमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील पाणीपुरवठा संबंधित कामांचा आढावा घेतांना मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे देशभरातून लाखो भाविक येतात. याठिकाणी येत्या काळात पाणी पुरवठ्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो. भाविकांची गैरसोय होवू नये यासाठी सूक्ष्म नियोजन करुन पाणीपुरवठ्याचे काम करावे, असे निर्देश मंत्री श्री.पाटील यांनी दिले.सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी रस्त्यांच्या कामांची माहिती घेतली. श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेवून नियोजन करावे. पोहरादेवी, उमरीगड आणि नंगारा भवन परिसरातील रस्ते समृद्धी महामार्गाला जोडण्याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव शासनस्तरावर सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.नंगारा भवन व वास्तू संग्रहालयातील अंतर्गत काम पाहून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कौतुक केले. हा नंगारा भवन नागरिकांसाठी उपलब्ध व्हावा यादृष्टिने लवकरात लवकर काम पूर्ण करण्याची सूचना त्यांनी केली.यावेळी पालकमंत्री संजय राठोड, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी नंगारा भवनाच्या प्रगतीपथावरील कामांची संयुक्त पाहणी केली. यावेळी विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या आढावा बैठकीत अधीक्षक अभियंता अविनाश धोंडगे यांनी प्रगतीपथावरील कामांची माहिती दिली. नंगारा भवन बांधकामाचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून अंतर्गत सजावटीचे काम ४० टक्के पूर्ण झाल्याचे त्यांनी बैठकीत सांगितले. बैठकीच्या सुरुवातीला अमरदिप बहल यांनी नंगारा भवनातील अंतर्गत कामांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# डॉ.सतिश वारजूकर यांची अपघात ग्रस्तांच्या कुटुंबाला आर्थिक मदत

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकर्ला येथील दोन युवकांचा अपघात झाला. त्या अपघातात दोन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाला त्यामुळे दोन कुटुंबावर मोठे संकट कोसळले. त्या अपघात ग्रस्त दोन्ही कुटुंबाला राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजुकर यांनी भेट घेऊन आर्थिक मदत केली.



याबाबत अधिक माहिती अशी की, चिमूर तालुक्यातील वाकर्ला येथील युवक राहुल राऊत, व लक्ष्मण ढेंगरे या तरुणांचा शंकरपूर येथून नागपूर येथे टाटा एस गाडीने हिरवी मिरची विकून परत येत असताना त्यांच्या गाडीला मागवून मोठ्या ट्रकने धडक दिल्याने दोघांचाही जागीच दुर्देवी मृत्यू झाला होता. घरातील करते धरते असणारे कमवते युवक असे काळाने हिरावून नेल्याने कुटूंब उघड्यावर पडले. व मोठे आर्थिक संकट कोसळले. त्यामुळे राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ. सतिश वारजूकर यांनी या अपघाताची दखल घेत गुरुवार दि.१५ रोजी वाकर्ला येथे कुटुंबीयांची भेट घेऊन आधार देत आर्थिक मदत केली. या प्रसंगी चिमूर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष रोशन ढोक, प्रदीप सोनटक्के, बालू माळवे, सूरज गायकवाड, मंगेश राऊत, सुधाकर राऊत, लक्ष्मण माळवे, स्वप्नील ढेंगरे, अमोल तुमराम, रोशन मोहड, प्रकाश माळवे उपस्थित होते.

# व्यापारी संकुलाच्या ६१ गाळयांचे आरक्षण जाहीर

**मूल । प्रतिनिधी**

मूल न.प. तर्फे मोक्याच्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुलाच्या ६१ गाळयाची आरक्षण सोडत सभा नुकतीच पार पडली व यात विवीध प्रवर्गाकिरता आरक्षण घोषीत करून एक चांगला उपक्रम संपन्न झाला. मूल न.प. कार्यालयात संपन्न झालेल्या या सोडत उपक्रमात न.प.मुख्याधिकारी यशवंत पवार, न.प.अधिकारी व कर्मचारी,शहरातील प्रतिष्टीत नागरीक,पत्रकार उपस्थित होते. यात अनुसूचीत जाती,जमाती,विमुक्त जाती यांचे करीता ३ गाळे( गाळे न.१,३७,५४), दिव्यांग नागरिकांकरीता ३ गाळे(गाळे न. १०,२४,४८),बेरोजगार सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र करीता ६ गाळे(गाळे न.२१,६,२६,२८,४६,६०), मराठी साहित्यिक विक्री करीता १ गाळा(गाळा न.२५) आरक्षीत करण्यात आले आहे. इतर




गाळे सर्वसामान्य प्रवर्गाकारीरिता लॉटरी पद्धतीने आरक्षित करण्यात आले आहेत.सदर व्यापारी संकुल अगदी मोक्याच्याठिकाणी असल्याने व खरेदी किंमत वाजवी राहणार असल्याने सर्वसामान्य नागरिकांना याचा लाभ घेता येणार आहे हे विशेष. यात महिला व्यावसायीकांना वाव मिळाला नाही याची खंत व्यक्त करण्यात आली.

# बोरचांदली येथील अवैध दारू विक्रेत्याविरोधात महिलांचा एल्गार



**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यातील बोरचांदली येथे मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असल्याने युवकांसोबतच अनेक अल्पवयीन मुलेही दारूच्या आहारी गेले आहेत.परिणामी गावातील वातावरण कलुशित झाले असून पती-पत्नीत वाद निर्माण होत आहे. त्यामुळे गावात अवैधरीत्या सुरू असलेली दारूविक्री बंद करण्यात यावी,यासाठी शेकडो महिलांनी पोलिस स्टेशन गाठून गुरुवारी पोलिस निरीक्षकांना निवेदन दिले.

राज्यात दारूची आडवी झालेली बाटली उभी झाली. शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातील दारू बंदी उठविल्याने जिल्ह्यातील परवानाधारक दारूची दुकाने सुरू झाली असे असले तरी बोरचांदली येथे अवैध दारू विक्री राजरोसपणे सुरू आहे.गावातच दारू मिळत असल्याने पहाटेपासून पुरुष दारूचे सेवन करीत आहेत. त्यामुळे कुटुंबातील पती-पत्नी वाद होऊन कौटुंबिक सलोखा नाहिसा होत आहे.तसेच गावातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गावातील अवैध सुरू असलेली दारू विक्री बंद करून विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी येथील महिलांनी पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# गोंडपिपरी तालुक्यातील खळबळजनक घटना

## झोपेत असताना पत्नीची कुऱ्हाडीने पतीनेच केली निर्घृण हत्या

**गोंडपिंपरी** –मध्यरात्रीच्या सुमारास दोन्ही मुले गावातील शेतकऱ्याकडे मजुरीसाठी कापसाची गाडी भरायला गेली असता झोपेत असलेल्या वेडगाव येथील लता दामोदर धुडसे( वय ४० वर्ष ) यांच्यावर पतीनेच वार करून निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना दि.(१६) शुक्रवारी मध्यरात्री दीड वाजता घडली.गावातील शेतकऱ्याकडे मजुरीसाठी मृतक लता धूडसे यांचे दोन्ही मुले कापूस भरण्यासाठी गेली व मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास घरी काम आटपून परतले असता त्यांची आई ही रक्ताच्या थारोळ्यात पडलेली दिसली बाजूला कुऱ्हाड देखील होती. आणि वडीलांचा शोध घेतला असता कुठेच आढळले नाही. फरार असल्याचे निदर्शनास आले.पत्नीवर आरोपी दामोधर मारोती धुडसे यांनी कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या केल्याचां अंदाज असून घडलेली माहिती गावकऱ्यांनी लाठी पोलिसांना दिली सकाळी पोलीस घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा करत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. आरोपीचा शोध लाठी पोलीस घेत आहे.हत्तेचे कारण गुलदस्त्यात असून पोलीस तपास करत आहे.

# चिंधी माल येथील शेतात वाघाच्या हल्ल्यात गाय ठार

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील चिंधी माल येथील गावाशेजारील बोळीला लागून असलेल्या शेतात चरत असलेल्या गाईवर पट्टेदार वाघाने हल्ला करून तिला जागीच ठार केल्याची घटना गुरुवारी (दि.१५ फेब्रुवारी) सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास घडली.नुकसान ग्रस्त गाय मालक शेतकऱ्याचे नाव रामकृष्ण आत्राम असे आहे.यामुळे या गरीब शेतकऱ्याची फार मोठी आर्थिक नुकसान झाली आहे.त्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी मनसेचे नागभीड तालुका उपाध्यक्ष विलास सुतार यांनी केली आहे.तालुक्यातील चिंधी चक गट ग्रामपंचायतीतील व वन विभाग नागभीड अंतर्गत येत असलेल्या चिंधी माल या गावाशेजारील बोळीला लागून असलेल्या शेतात पट्टेदार वाघाने चरत असलेल्या गोरीवर हल्ला करून तिला जागीच ठार केले.यामुळे या गरीब शेतकऱ्याची ६० हजार रुपयाची नुकसान झाली आहे.सदर घटनेची माहिती नागभीड वनपरीक्षेत्र विभागाला देण्यात आली असून वन कर्मचाऱ्यांनी पंचनामा केला आहे.या घटनेमुळे गावात वाघाची प्रचंड दहशत पसरली आहे.



# ५१ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये डिकंपोजेबल पॉट्स ठरली लक्ष्यवेधी




**पुलगाव । प्रतिनिधी**

दिनांक ०७ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी ला सावंतवाडी जिल्हा सिंधुदुर्ग येथे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आर.के. ज्युनिअर कॉलेज,पुलगाव मधील विज्ञान प्रतिकृती डिकंपोजेबल पॉट्स ला विद्यार्थी गट ९ ते १२ मध्ये राज्यात ११ व्या क्रमांकाने गौरविण्यात आले.

या मध्ये सहभागी विद्यार्थी वर्ग ११ वी विज्ञान अनुदानित चे दीपेश करवडे,ओशन पाटील, चाहत विश्वकर्मा आणि तेजस धवराल तसेच मार्गदर्शक शिक्षक अजय कोयाळ,गौरव दुधबावरे आणि अजय धोटे यांचे आर.के.हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष हरिप्रकाश केजरीवाल,शाळा समिती अध्यक्ष रंजनकुमार केजरीवाल,जेष्ठ विश्वस्थ द्वारकादास दरक तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव,संस्थेचे प्राचार्य संजय सहारे , उपमुख्याध्यापिका माया वंडलकर , उपप्राचार्य सुनील भोयर ,पर्यवेक्षक गणेश इंगळे ,पर्यवेक्षक लालबहादूर यादव तसेच आर. के .परिवारातील सर्व शिक्षक शिक्षकेतकर कर्मचारी बंधू-भगिनींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरिता हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्याव-छगन भुजबळ

मुंबई (प्रतिनिधी) मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावं ही आमची भूमिका पहिल्यापासून आहे मराठा समाजाला मागच्या दारानं कुणबी म्हणून घुसवू नका, सगेसोयरे यातून नको ती व्याप्ती वाढवू नका यासाठी आमची लढाई सुरु आहे. मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्या, अशी आमची भूमिका आहे. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसचं सरकार असताना एक कायदा केला पण तो फेटाळला गेला. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात गायकवाड आयोग नेमण्यात आला त्यांनी दिलेलं आरक्षण हायकोर्टात टिकलं पण सुप्रीम कोर्टात ते नाकारण्यात आलं. त्यातील त्रुटी कमी करण्यासाठी शुक्रे आयोग नेमण्यात आला, जुन्या लोकांनी राजीनामे दिले. १५ ते २० दिवसात अडीच कोटी घरांचं सर्वेक्षण केल्याचं ऐकल्याचं छगन भुजबळ म्हणाले.क्युरेटिव्ह पिटीशन साठी तीन न्यायमूर्ती बसलेले आहेत. शुक्रे आयोग मराठा समाजाला वेगळं आरक्षण कसं दिलं जाइल आणि ते कसं टिकेल, यासाठी प्रयत्न करत आहेत. सर्वसाधारणपणे ते



१५ तारखेला आरक्षण मिळेल असं वाटलं होतं. मनोज जरांगेंना वाटलं असेल की १० तारखेला उपोषणाला बसलो १५ तारखेला आरक्षण मिळालं की दुसरा गुलाल उधळता येईल. पण ते काम पूर्ण झालेलं नाही, ते पाच सात दिवस पुढं गेलेलं आहे. यामुळं मनोज जरांगे यांच्या तब्येतीचा प्रश्न निर्माण झाला आहे, असं भुजबळ यांनी सांगितलं.मनोज जरांगे आता शिव्या द्यायला लागलेले आहेत. मुख्यमंत्र्यांना, दोन उपमुख्यमंत्र्यांना आणि मला शिव्या देत आहेत. तिथे असलेल्या विभागीय आयुक्त, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हाधिकारी यांना त्यांनी अपशब्द वापरले. मनोज जरांगे यांनी त्रागा करुन घेण्यापेक्षा शांत बसावं, मराठा समाजाला आरक्षण देण्याचा कायदा पास करत आहोत. कुणाला शिव्या देऊन, भानगडी करुन काय फायदा आहे, असं छगन भुजबळ म्हणाले.आमचा लढा जो आहे ज्यांना कुणबी म्हणून घुसवलं आहे, त्याविरोधात आमचा लढा कोर्टात आणि रस्त्यावर सुरु राहणार आहे. एका दिवसाचं अधिवेशन आयोजित करण्यात त्यावेळी कोणी विरोध करणार नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही. सुप्रीम कोर्टानं मराठा समाज हा मागास समाज नसल्याचं म्हटलं आहे. येनकेन प्रकारे कुणबी प्रमाणपत्र दिली जात आहेत, असं छगन भुजबळ म्हणाले.

# आर.के.हायस्कूल मध्ये संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात



**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक आर. के.माध्यमिक विद्यालयात संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संस्थेचे प्राचार्य संजय सहारे , पूर्व माध्यमिक विभागातील ज्येष्ठ शिक्षक अनिल पोटदुखे व साधना रेवतकर यांनी प्रतिमेचे पूजन व हार अर्पण केले. यावेळी संस्थेच्या उपमुख्याध्यापिका माया वंडलकर , पर्यवेक्षक लालबहादुर यादव व्यासपीठावर उपस्थित होते. या निमित्ताने वर्ग सात मधील विद्यार्थिनी आकांक्षा बहिरम, माही पवार संत यांनी सेवालाल महाराज यांच्या जीवनाबद्दल आपल्या भाषणातून माहिती दिली. तसेच पूर्व माध्यमिक विभागातील कलाशिक्षक रवींद्र राठोड संत सेवालाल महाराज यांच्या एकूण जीवनावर, त्यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर राऊत यांनी केले तर उपस्थितांचे आभार मनिषा रवाळे यांनी मानले. यावेळी पूर्व माध्यमिक व माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक बंधू भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# जबाबदाऱ्या आणि स्वावलंबन विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उपयुक्त-नाजुका आलाम

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील चितेगाव, बोरचांदणी, जुनसुर्ला , नवेगाव, बेंबाळ, गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये बुक वाटपचंद्रपूर, दिनांक १६ फेब्रुवारीला विद्यार्थ्यांच्या बुध्दितमत्तेला योग्य दिशा द्यायची असेल तर त्याची सुरवात त्यांच्या लहानपणापासूनच करायला हवी. विद्यार्थ्यांवर पडलेल्या अशा छोट्या-छोट्या आर्थिक जबाबदाऱ्या आणि स्वावलंबन त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी उपयुक्त ठरतात अश्या सामाजिक कायकर्त्या नाजुका हनुमान आलाम यांनी म्हणाल्या.

महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा चंद्रपूरचे माजी सभापती काँग्रेस नेते दिनेश चोखारे यांच्या मार्गदर्शनात सामाजिक कायकर्त्या नाजुका आलाम, काँगेसचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते करण कुंभरे, यांचे उपस्थित मूल तालुक्यातील चितेगाव, बोरचांदणी, जुनसुर्ला , नवेगाव, बेंबाळ, गोवर्धन येथील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमध्ये बुक वाटप करण्यात आले.यावेळी चितेगाव येथे शाळा समितीचे अध्यक्ष गुणजी वाकुडकर, सदस्य अरुण मेश्राम, जिल्हा परिषद






शाळेचे मुख्याध्यापक धर्मरन्त वाकडे, शिक्षक गोविंदा सोनटक्के, संजय गुरुनुले, शिक्षिका कल्पना वाकडे, वर्षा नरुले, बोरचांदणी येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापिका आशा जोगी, समितीचा अध्यक्ष संदीप कळसार, जिल्हेवार, माधुरी पोरेड्डीवार , पेंदोर , जुनसुर्ला येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बलराम वाळके, गावचे उपसरपंच राजेश गोवर्धन, समितीचे अध्यक्ष मनोज बेले, उपाध्यक्ष वर्ष मडावी, शिक्षक प्रेमदास सुरपाम, गणेश कुलसंगे, प्रतिभा नगराळे , चित्रगत पुसतोडे, रेखा वारपल्लीवार, मंजुषा पारखी , वृंदा पगडपल्लीवार, बेंबाळ येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद धामणे, शीक्षक राजेश सांगडे, विद्या निलगिलवार , कल्पना मेश्रामी , कालिदास कोसरे, गावातील प्रतिष्ठित अजय बासरकर, नवेगाव येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बंडू गेडाम, समितीचे सदस्य साईनाथ बुडे, शिक्षक कैलास वडक,. विजय बावणे, किरण मानकर, जगदीप दुधे, बालस्वामिओ कुमरे, उमाकांत दोडके, आकाश कुकुलकर, गोवर्धन येथे जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक बबन कन्नाके, समितीचे वर्षा कलाने यांचेसह तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि शाळेतील कर्मचारी उपस्थित होते.पुढे बोलतांना त्या म्हणाल्या कि, दिनेश चोखारे याचे हे कार्य अभिमानास्पद असून आज आपल्याला सामाजिक कार्यासह सर्व क्षेत्रात प्रगती करावीच लागेल. जोपर्यंत आपण ध्येय ठेऊन काम करत नाही, तोपर्यंत आपण काय करतो याला महत्त्व नाही. म्हणून समाजात वावरताना कोणता तरी उद्देश समोर ठेऊनच ध्येय प्राप्त करावे लागेलच. विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रात भेदभाव न करता प्रगती केली पाहिजे. मुलांच्या बुध्दितमत्तेला योग्य दिशा द्यायची असेल तर त्याची सुरवात त्यांच्या लहानपणापासूनच करायला हवी. आपण त्यांच्यावर योग्य वयात संस्कार दिले तर त्यांना गोष्टींची जाणीव होईल. मुलांना योग्य वयात बचत आणि बचतीशी संबंधित गोष्टी शिकवा. बचत आणि खर्च यातला फरक त्यांना समजावून सांगा. देशातील वेगवेगळ्या बँकांनी लहान मुलांसाठी बँकेचे खाते उघडण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे. ही एक नवी वाटचाल आपल्या मुलांना अगदी लहान वयापासूनच जागरूक करेल.बचत कशी करायची त्याचे फायदे काय हेही त्यांना सांगा असे सामाजिक कायकर्त्या नाजुका हनुमान आलाम यांनी सांगितले.वरील सर्व शाळांमध्ये सामाजिक कार्यकर्ता नाजूका आलाम, काँगेसचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते करण कुंभरे, यांनी शाळांना पुस्तके आणि शालेय साहित्याचे वाटप केले.

# आदिवासी जिल्ह्यातील युवक युवतींना होता येणार वैमानिक

## चंद्रपूर फ्लाईंग स्टेशन अंतर्गत प्रशिक्षण देण्याचे नियोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

नक्षलग्रस्त, दुर्गम व आदिवासी जिल्ह्यातील युवक-युवतींचे वैमानिक होण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी चंद्रपूर फ्लाईंग स्टेशन अंतर्गत मोरवा विमानतळ, चंद्रपूर येथे जिल्ह्यातील युवक-युवतींना वैमानिक प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात येत आहे.सदर प्रशिक्षणाकरीता प्रति विद्यार्थी एकूण प्रशिक्षण खर्च रुपये अंदाजे ४१ लक्ष येणार असून, लेखी परीक्षा व वैद्यकीय तपासणीअंती निवड करण्यात येणाऱ्या एकूण १० विद्यार्थ्यांकडून एकूण प्रशिक्षण खर्चाची १० टक्के रक्कम भरून घेऊन त्यांना १८ महिन्याचे वैमानिक प्रशिक्षण देण्याचे प्रयोजन आहे.

लाभार्थी उमेदवाराकरीता निकष:उमेदवाराची शैक्षणिक पात्रता १०+२ भौतिकशास्त्र व गणित विषय घेऊन, ग्रामीण भागासाठी किमान ६५ टक्के गुण व शहरी भागासाठी किमान ७० टक्के गुण प्राप्त करून पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेला असावा किंवा झालेली असावी. उमेदवार डीजीसीए मान्यताप्राप्त वैद्यकीय अधिकाऱ्याकडून केल्या जाणाऱ्या तपासणीमध्ये शारीरिकदृष्ट्या पात्र असणे आवश्यक आहे.सदर प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता जिल्हा प्रशासनाकडून अर्ज मागविण्यात येतील. त्यानंतर लेखी परीक्षेद्वारे पात्र झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल व अंतिमरित्या पात्र विद्यार्थ्यांची वैमानिक प्रशिक्षणाकरिता निवड करण्यात येईल, असे उपजिल्हाधिकारी (अति.) दगडू कुंभार यांनी कळविले आहे.

# तळोधी पोलिसांनी हरविलेल्या ८ मोबाईलचा लावला शोध

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गावांतील काही मोबाईल धारकांनी मोबाईल हरविल्याची तक्रार ठाण्यात दाखल केली असता त्यांचा शोध घेऊन ८ मोबाईल धारकांना त्यांचे मोबाईल परत मिळाल्याची माहिती तळोधी पोलिसांनी गुरुवारी दिली.

तळोधी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या काही गावांतील नागरिकांनी त्यांचे मोबाईल हरविल्याची तक्रार तळोधी पोलीस स्टेशन मध्ये केली होती. दरम्यान पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या सूचनेनुसार सायबर सेल चंद्रपूर व तळोधी पोलीस स्टेशन यांनी तांत्रिक माहिती घेऊन चोरीला गेलेले ८ मोबाईल हँडसेट शोधून




काढण्यास तळोधी पोलिसांना यश आले.व मूळ मालकांना त्यांचे मोबाईल परत करण्यात आले.यामध्ये जफ्रून निसा तळोधी,नरेंद्र मानकर तळोधी,स्वाती गंजेवार वाढोणा,गुरूदास गोपाले तळोधी,कृष्णदास कानझोडे, प्रफुल बारसागडे, सुधाकर भानारकर,निकेश राऊत यांचा समावेश आहे. सदर मोबाईल हँडसेट उप विभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे व तळोधी पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजितसिंग देवरे यांच्या उपस्थितीत मूळ मोबाईल धारकांना परत करण्यात आले.याबद्दल या सर्वांनी पोलीस विभागाचे आभार मानले आहे.

# बल्लारशा येथून मुंबई करिता दररोज नंदीग्राम एक्सप्रेस व पुणे करिता आठवडयातून ३ दिवस लवकरच रेल्वे धावणार-हंसराज अहीर

## हंसराज अहीर यांच्या प्रयत्नांचे फलित-मध्ये रेल्वे विभागाने विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडून मागीतला अहवाल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर येथून मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे नसल्याने जिल्हयातील अनेक विद्यार्थी - पालक व व्यापा-यांना ईतर पर्यायाचा अथवा नागपूर येथून रेल्वे प्रवास सुरू करावा लागत होता. चंद्रपूर येथून मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे असावी अशी विविध स्तरावरून मागणी होत असतांना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी मागणीची गांभीर्याने दखल घेत दिल्ली येथे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत थेट बल्लारशा येथून मुंबई व पुणे करिता रेल्वे सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून रेल्वे विभागाने हंसराज अहीर यांच्या मागणीचे संदर्भ देत दि. १२ फेब्रुवारी २०२४ रोजी यासंबंधीचे पत्र विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर यांना जारी करून रेल्वे सुरू करण्यासाठी व्यवहार्यता टिप्पणी सादर करण्याच्या सुचना केल्या आहेत.



दि. १३ डिसेंबर २०२३ रोजी हंसराज अहीर यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत काझीपेठ पुणे ट्रेन न २२१५१/५२ बल्लारशा येथून सुरू करावी अशी मागणी केली होती. तसेच नंदीग्राम एक्सप्रेस ट्रेन नं. ११४०१/०२ ही मुंबई येथून आदिलाबाद पर्यंत येत असतांना या रेल्वेचे विस्तारीकरण करून बल्लारशा पर्यंत सुरू करावी या मागणीसह चर्चा केली. नंदीग्राम या रेल्वे च्या मार्गात भद्रावती, वणी, पिंपळखुटी या ठिकाणी थांबणार आहे. अहीर यांच्या या चर्चेला अनुसरून मध्य रेल्वे विभागाने सदर पत्र विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नागपूर यांना जारी केले आहे. या पत्रान्वये बल्लारशा येथून मुंबई करिता दररोज तर पुणे करिता आठवडयातून ३ दिवस रेल्वे धावणार आहे.मुंबई व पुणे करिता थेट रेल्वे सुरू होणार असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये चैतन्याचे वातावरण असून यात्रेकरूंसाठी ही रेल्वे विशेष सुविधेची ठरणारी आहे. याबाबत अधिक माहिती देत हंसराज अहीर यांनी सांगीतले की, सदर रेल्वे गाडया जलद गतीने सुरू करण्यासाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापक नागपूर यांच्याशी चर्चा केली असून त्वरीत व्यवहार्यता टिप्पणी मध्य रेल्वे मुंबई कार्यालयास सादर करण्याची सुचना केली आहे. या रेल्वे सुरू होत असतांना चंद्रपूर, गडचिरोली व यवतमाळ जिल्हयातील प्रवाशी, विद्यार्थी, पालक, व्यापारी व यात्रेकरू यांना भरिव फायदा होणार असून हंसराज अहीर यांचे हे प्रयत्न चंद्रपूर जिल्हयातील रेल्वे सुविधेमध्ये नक्कीच मैलाचा दगड ठरेल असा सार्थ विश्वास चंद्रपूर रेल्वे संघर्ष समितीच्या वतिने व्यक्त करून हंसराज अहीर यांचे आभार मानले आहे.

# १७ ते २०फेब्रुवारी महासंस्कृती व बल्लारपूर महोत्सव

## नामवंत तसेच स्थानिक कलाकारांचे सादरीकरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र राज्य व जिल्हा प्रशासन चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते २० फेब्रुवारी २०२४ दरम्यान जुना तालुका क्रीडा संकूल,गौरक्षण वॉर्ड,बल्लारपूर येथे महासंस्कृती व बल्लापूर महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्हा तसेच राज्यातील संस्कृतीचे सादरीकरण होणार असून नामवंत कलाकारांसोबतच स्थानिक कलाकारांचेसुध्दा सादरीकरण होणार आहे.


सांस्कृतिक महोत्सवाचे उद्धाटन१७फेब्रुवारीला सायंकाळी५.३०वाजता वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या महोत्सवात१७फेब्रुवारी२०२४रोजी सायंकाळी७ते१०या वेळेत प्रसिध्द पार्श्वगायक सुखविंदरसिंह यांची स्वरसंध्या, १८फेब्रुवारी रोजी स्थानिक कलाकारांचे वाघ नृत्य,शिव महिमा नृत्य आणि गर्जा महाराष्ट्र माझा हा कार्यक्रम, १९फेब्रुवारी रोजी'आझादी - ७५'यावर आधारीत नाट्य आणि२०फेब्रुवारी रोजी सायंकाळी७ते१०या वेळेत संस्कार भारती हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.प्रशासनाच्या वतीने आयोजित महासंस्कृती व बल्लारपूर महोत्सव सर्वांसाठी खुला व निःशुल्क असणार आहे. या महोत्सवात स्थानिक कलावंतांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेण्यात येणार आहे. जिल्हावासीयांनी या महोत्सवास उपस्थित राहून सर्व कलावंतांचा उत्साह वाढवावा व आपल्या संस्कृतीला अनुभवण्याचा आंनद घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. तसेच जिल्हा महासंस्कृती महोत्सव आयोजन समितीने केले आहे.

# ४८ वर्षानंतर जगप्रसिध्द पैलवान पुन्हा उतरणार चंद्रपूरातील दंगलीत

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात तिन दिवसीय राज्यस्तरिय कुस्ती स्पर्धा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१९७५ साली चंद्रपूरातील कोहिनूर तलावाच्या मैदानावर जगप्रसिद्ध पैलवान दारासिंग रंधावा आणि झिबिस्को यांची लढत झाली होती. त्यानंतर आता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून तब्बल ४८ वर्षाने महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख आणि हरियाणा केसरी जस्सा (छोटा) या जगप्रसिध्द पैलवांनाची लढत १७ फेब्रुवारीला शनिवार महाकाली मंदिराच्या पटांगणात होणार आहे. हा सामना सांयकाळी ८ वाजता सुरु होणार आहे.



आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत कबड्डी, बॉडी बिल्डिंग स्पर्धा पार पडली आहे. तर आता उद्या १६ फेब्रुवारी पासून चंद्रपूर शहर तालीम संघ यांच्या सहकार्याने तिन दिवस राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महाकाली मंदिर येथील पटांगणात सदर स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत राज्यभरातील कुस्ती पट्टू सहभाग घेणार आहे. ही स्पर्धा पूरुषांचे ९ वजन गट आणि महिलांचे ८ वजन गट अशा ऐकून १७ वजन गटात सदर स्पर्धा पार पडणार आहे. मागील वर्षीची अहमद नगर येथील महाराष्ट्र केसरी भाग्यश्री फंड, आंतरराष्ट्रीय कुस्तीगीरी सोनाली मंडलीक, उपमहाराष्ट्र केसरी कौतुक धापडे, विजय शिंदे, रोहन रंदे आदी नामांकित कुस्तीपट्टु सदर स्पर्धेत सहभागी होणार आहे.श्री माता महाकाली क्रिडा महोत्सवात आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख विरुध्द हरीयाना केसरी जस्सी (छोटा) यांची विशेष लढत रंगणार आहे. तर अर्जुन पूरस्कार प्राप्त दिव्या काकरण विरुध्द पंजाब व हरियाणा केसरी जसप्रीत कौर यांची लढत रंगणार आहे. या स्पर्धेकरीता महान भारत केसरी योगेश बोंबाळे यांची उविशेष उपस्थिती राहणार आहे.

# वरोरा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने स्वराज्य सप्ताह तथा स्नेह मिलन सोहळा संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वतीने स्वराज्य सप्ताह तथा स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन वरोरा येथील वणी बायपास मार्गावरील साईमंगल कार्यालयात सकाळी साडे अकरा वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्प माल्हार्पण व दीप प्रज्वलन करून स्वागत गीताने करण्यात आले. या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नितीन भटारकर जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस ,व स्वागताध्यक्ष म्हणून विलास नेरकर विधानसभा अध्यक्ष वरोरा भद्रावती तथा चंद्रपूर जिल्हा नियोजन समिती सदस्य ,प्रमुख पाहुणे म्हणून रंजना पारशिवे महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ,राजू बोरकर तालुकाध्यक्ष भद्रावती,गितेश सातपुते, दीपक तुरारे,रवींद्र भोयर तालुकाध्यक्ष वरोरा ,चंद्रकांत कुंभारे शहराध्यक्ष वरोरा , अर्चना आरेकर महिला तालुकाध्यक्ष भद्रावती,उषा आखाडे, उमा नागपुरे तसेच कार्यक्रमाला मुख्य आकर्षण म्हणून कु. दीक्षा गुरणुले शिवव्याख्याते पांढरकवडा जिल्हा यवतमाळ तसेच कुमारी रूपाली पवार,चित्रपट फेम मुंबई इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



आदिशक्ती निऋती ते सावित्रीबाई फुले पर्यंत अनेक महापराक्रमी स्त्रियांनी ईतिहास घडविला, शेतीचा शोध लावून मानवी जीवनाला स्थिरता प्रदान केली शिवराज्याची निर्मिती करून जिजाऊ माँ साहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांना लोककल्याणकारी राजा म्हणून जगापुढे आदर्श निर्माण केला आजही प्रत्येक घरात जिजाऊ आहे परंतु तिला इतिहास घडविण्यासाठी संधी सातत्याने नाकारण्यात आली या स्वराज्य सप्ताह तथा स्नेहमिलन सोहळ्यातून सर्व प्रकारच्या अज्ञानाच्या शृंखला तोडून विकासाचा शाश्वत मार्ग निर्माण व्हावा या मातृसत्ताक स्वराज्य निर्माण व्हावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते .

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी शिवरायांचा इतिहास आणि सध्याच्या परिस्थितीतील राज्यातील आव्हाने यावर मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कुंभारे शहर अध्यक्ष वरोरा तर आभार प्रदर्शन राजू बोरकर तालुकाध्यक्ष भद्रावती यांनी केले.कार्यक्रमाला गीता नवले,वंदना काळे, सोनू झाडे,मंदा घागी, ललिता आत्राम,पूनम नवले,लता किन्नके,शिला कोटनाके,कुंदा करलुके, माधुरी चामटकर,मंजुषा परशिवें,कोमल गबने, ललिता झाडे,गीता ठक, अर्चना ननावरे,खुशी श्रीरंग, दीपाली बडवाईक,श्रद्धा चतुरकर,वंदना बोरकर, प्रभा कोले,प्रमोद तीवाडे,अखिल कडूकर, मोहन जुनघरे,शेखर भोयर, मंगेश पोले, जीवन बावणे,रमेश कराळे,दिलीप खैरे,दिनेश मोहारे,अजय गायकवाड, रवींद्र ठाकरे,दिलीप महल्ले, संदीप सोमलकर,रामदास ननावरे शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# शासकीय यंत्रणेच्या गैरवापरामुळे सध्याची लोकशाही धोक्यात-प्रा.श्याम मानव

**भद्रावती । प्रतिनिधी**

आज समाजाप्रती निष्ठने काम करणाऱ्या लोकांवर भ्याड हल्ले होत आहे त्याचा मी या ठिकाणी जाहीर निषेध व्यक्त करीत आहे. सामाजिक, आर्थिक व राजनीतिक न्याय समता मिळणे हीच खरी लोकशाहीची व्याख्या आहे. अंधश्रद्धे विरुद्ध काम करीत असताना काही लोकांचा त्रास होत आहे परंतु जनकल्याणाकरिता हे कार्य मी अविरत सुरू ठेवण्याची आपणा सर्वांना ग्वाही देतो, मी जाती-पातीला कधी थारा देत नाही, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील जाती वर्णावर विस्तृत वर्णन करीत आजच्या राज्यघटनेचे नीतिमूल्य सर्वांनी जपले पाहिजे, आज विचार करण्याचे स्वातंत्र्य नष्ट झाले आहे, देशात सांप्रदायिक वातावरण तयार झाले त्यामुळे मूठभर लोक सत्तेवर आले. देशातील वातावरण खराब होत चालले आहे. आज सर्वांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्विकारावा तरच देशाची खरी उन्नती होते. मनुवाद्यांनी डार्विनच्या उत्क्रांतीचा सिद्धांत कसा खोटा ठरविला ते सविस्तर स्पष्ट करीत आज अवैज्ञानिक अंधश्रद्धा पसरवली जात आहे तसेच अवैज्ञानिक गोष्टीचा अवलंब करणे हीच आजच्या लोकशाहीला घातक आहे. आज सर्व सरकारी नोकऱ्या संपुष्टात आल्या आहेत. सर्व ठिकाणी कंत्राटी पद्धतीने काम सुरू आहे. आज देशाच्या न्यायव्यवस्थेची स्थिती कशी बिकट झाली आहे तसेच आज ईडी सारख्या संस्थांचा कसा गैरवापर होत आहे हे सविस्तर स्पष्ट करीत आज मतदारांना जागरूक असणे आवश्यक आहे तरच देशाची लोकशाही टिकेल व देश सुरळीत चालेल. भारतीय लोकशाही टिकली पाहिजे. त्याकरिता सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे भद्रावती शिक्षण संस्था,भद्रावती द्वारा आयोजित निळकंठराव शिंदे विज्ञान व कला महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात जाहीर व्याख्यानात प्रमुख व्याख्याते माननीय प्रा .श्याम मानव, (राजकीय विश्लेषक व संस्थापक संघटक अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती) यांनी भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर बोलताना आपले विचार व्यक्त केले.




याप्रसंगी य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड भूपेंद्र रायपुरे (भद्रावती),ड. पुरुषोत्तम सातपुते (चंद्रपूर), ड.गोविंद भेंडारकर(ब्रम्हपुरी), सुरेश झुरमुरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती व आयोजक भद्रावती शिक्षण संस्था भद्रावतीचे अध्यक्ष, डॉ .विवेक शिंदे उपस्थित होते.याप्रसंगी श्रीमती नीलिमाताई शिंदे, श्रीमती सुषमाताई शिंदे, प्राचार्य एल. एस. लडके, प्राचार्य जयंत वानखेडे, डॉ कार्तिक शिंदे, डॉ विशाल शिंदे, प्रा धनराज अस्वले, दिलीप शिंदे, श्री खडसे , रविंद्र शिंदे, डॉ. प्रिया शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.भद्रावती शिक्षण संस्था, भद्रावती व आम्ही भद्रावतीकर द्वारा आयोजित स्वर्गीय श्रीनिवास शिंदे मेमोरियल रवींद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्ट, चंद्रपूर, भद्रावती पत्रकार संघ, भद्रावती, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, भद्रावती, सर्व प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स वाहिनी प्रसारण, सोशल मीडिया, पोर्टल न्यू क्षेत्रातील पत्रकार संघ, तसेच अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विविध समाजसेवी महिला समिती, पुरोगामी विचार मंच, सामाजिक युथ फाऊंडेशन, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व महाविद्यालय प्रबोधन समिती, वकील, डॉक्टर्स, इंजिनियर्स, सेवानिवृत्त कर्मचारी आणि समाजातील सर्व संघटनांद्वारे या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. विवेक शिंदे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून भारतीय लोकशाहीमध्ये असा कार्यक्रम का घ्यावा लागतो? असे प्रश्नचिन्ह उपस्थित करीत अब्राहम लिंकन यांच्या लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरिता तयार करण्यात आलेले राज्य म्हणजे लोकशाही होय तसेच मुठभर लोकांमुळे लोकशाहीचा विनाश होत आहे तसेच आपल्याला संविधानाने दिलेली लोकशाही टिकवायची आहे त्याकरिता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे असे आपले मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष ड.भूपेंद्र रायपुरे यांनी भारतीय लोकशाही टिकावी तिचा अपऱ्हास होऊ नये त्यामुळे जीवनाचा अपऱ्हास होतो तसेच सर्वांनी संविधानाची जपवणूक करावी, संविधानाने सर्वांना समान अधिकार दिला आहे व त्यामध्ये जगण्याची मूल्ये स्थापित होतात, लोकशाहीच्या रक्षणासाठी आपण सर्वांनी पुढे यावे असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्वांना जाहीर आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. डॉक्टर सुधीर मोते, आभारप्रदर्शन रविंद्र तिराणिक यांनी केले.

# चंद्रपूर जिल्हा भाजपा महानगर पदाधिकाऱ्यांची नावे जाहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रपूर राहूल पावडे यांनी नवनियुक्त पदाधिकारी यांची नावे जाहीर केली आहे. भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर, महिला मोर्चा, युवा मोर्चा, विविध आघाडी प्रमुख आणि मंडळ अध्यक्षांचा समावेश आहे.

भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर महामंत्री पदावर प्रज्वलंत कडू, सुरज पेदुलवार, रामपाल सिंग, किरण बुटले यांची नियुक्ती करण्यात आली आहे . सविता कांबळे या भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा असतील. महामंत्री पदावर शिला चव्हाण, सुष्मा नागोसे, कल्पना बगुलकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा युवा मोर्चा जिल्हा चंद्रपूर महानगरचे विशाल निंबाळकर हे अध्यक्ष असतील. युवा मोर्चा महामंत्री पदावर सुनिल डोंगरे, प्रमोद क्षिरसागर, क्रिष्णा चंदावार, गणेश रामगुंडेवार, सतिश तायडे, नरेंद्र बोपचे यांची निवड करण्यात आली आहे.भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर भाजपाच्या आघाडी प्रमुखांच्या नावांची घोषणा जिल्हाध्यक्ष राहूल पावडे यांनी केली आहे. ओबीसी आघाडीच्या अध्यक्षपदी मनोज पोतराजे यांची निवड करण्यात आली आहे. धम्मप्रकाश भस्मे हे अनुसूचित जाती आघाडीचे अध्यक्ष असतील. अनुसूचित जमाती आघाडीच्या अध्यक्षपदाची धनराज कोवे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. चाँदभाई पाशा यांचे नाव अल्पसंख्यांक आघाडीच्या अध्यक्षपदासाठी निवडण्यात आले आहे. रवी चहारे हे किसान आघाडीचे अध्यक्ष असतील.भाजपा जिल्हा चंद्रपूर महानगर मध्य मंडळ अध्यक्ष पदी सचिन कोतपल्लीवार, दक्षिण मंडळ अध्यक्ष पदी संदिप आगलावे, पूर्व मंडळ अध्यक्ष पदी दिनकर सोमलकर, उत्तर मंडळ अध्यक्ष पदी पुरुषोत्तम सहारे व पश्चिम मंडळ अध्यक्ष पदी रवी लोणकर यांची निवड करण्यात आली आहे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहूल पावडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष (ग्रा.) हरिश शर्मा, आमदार कीर्तीकुमार भांगडीया, आमदार रामदास आंबटकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंह चंदेल, प्रमोदभाऊ कडू, माजी आमदार प्रा. अतुल देशकर, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, ड. संजय धोटे, विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस, प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, सुदर्शन निमकर, भाजपा नेते अशोक जीवतोडे, भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, खुशाल बोंडे, राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर आदींनी अभिनंदन केले आहे.

# चंद्रपूर जिल्हा भाजपा ग्रामीणची कार्यकारिणी जाहीर

## जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी केली घोषणा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भाजपा जिल्हाध्यक्ष चंद्रपूर हरीश शर्मा यांनी नवनियुक्त कार्यकारिणीची नावे जाहीर केली आहे. यामध्ये भाजपा जिल्हा ग्रामीण सरचिटणीस,उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांचा समावेश आहे. दर तीन वर्षांनी कार्यकारिणीची नव्याने रचना केली जाते. त्यानुसार ही घोषणा करण्यात आलेली आहे.

जिल्हा ग्रामीणच्या सरचिटणीसपदी डॉ. मंगेश गुलवाडे, संध्या गुरनुले, ब्रीजभूषण पाझारे, राजू गायकवाड, विवेक बोढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नरेंद्र जीवतोडे, सुनील उरकुडे, नंदू रणदिवे, रेणुका दुधे, अजित मंगळगिरीवार, डॉ. भगवान गायकवाड, अरुण मस्की, सतीश धोटे, बबन निकोडे, नारायण हिवरकर, केशव गिरमाजी, सचिन करकाडे, अरविंद भुते, रश्मी पेशने, अविनाश पाल, सुरेश केंद्रे, विनायक देशमुख,समिर केने हे उपाध्यक्ष असतील.सचिवपदी विशाल गज्जलवार, सुनील नामोजवार, वाघुजी गेडाम, माणिक थेरकर, साकेत भानारकर, ज्योतीताई ठाकरे, रोशनी खान, विजय मोकाशी, मधुकर नरड, ओमप्रकाश मांडवकर,रुपेश डोर्लीकर, स्वाती वडपल्लीवार, विनोद चौधरी, कल्पना बोरकर, संजय उपगंनलावार, वंदना सिन्हा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मनोज सिंघवी हे कोषाध्यक्ष असतील.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे महाराष्ट्राचे वन व सांस्कृतिक कार्य तथा मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, केंद्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय गृहराज्य मंत्री हंसराज अहीर, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, आमदार कीर्तीकुमार भांगडीया, आमदार रामदास आंबटकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते चंदनसिंहजी चंदेल,माजी आमदार प्रा. अतुल देशकर, ड.संजय धोटे, माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, विद्या देवाडकर प्रदेश भाजपा चिटणीस , प्रदेश महिला मोर्चा सरचिटणीस अल्का आत्राम,माजी आमदार जैनुद्दीन जव्हेरी, सुदर्शन निमकर, भाजपा नेते अशोक जीवतोडे,भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत, प्रमोद कडू, खुशाल बोंडे, राजेंद्र गांधी, रमेश राजूरकर, संजय गजपुरे, नामदेव डाहुले,अनिल डोंगरे,आशिष देवतळे,महेश देवकाते, वंदना शेंडे, गौतम निमगडे, डॉ अंकुश आगलावे, अरुण मडावी, बंडू गौरकार,इमरान पठाण आदींनी अभिनंदन केले आहे.

# जिल्हा भाजपाच्या महामंत्री पदावर विवेक बोढे

**घुग्घुस । प्रतिनिधी**

भाजपा चंद्रपूर जिल्हा महामंत्री पदावर घुग्घुस येथील विवेक बोढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.चंद्रपूरचे भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा यांनी नवनियुक्त पदाधिकारी यांची नावे जाहीर केली आहे.



घुग्घुस शहरात ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राची भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात विवेक बोढे यांनी स्थापना केली. अभिनव कार्यशैली मुळे अत्यंत लोकप्रिय ठरलेल्या सेवा केंद्रातून ३० हजारांच्या वर लाभार्थ्यांना निःशुल्क लाभ मिळवून दिला आहे.

भाजपाचे घुग्घुस शहराध्यक्ष पासून ते भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष या पदावर विवेक बोढे यांनी यशस्वीरित्या कार्यकाळ पूर्ण केला आहे.ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राच्या माध्यमातून आणि भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी अनेक सेवाकार्य केली आहेत. गरजूंना विश्वकर्मा योजनेचा लाभ, आयुष्यमान कार्ड काढून देणे, एक रुपयात पिक विमा काढून देणे, महाज्योती फ्री टॅब योजना विद्यार्थ्यांसाठी राबवणे, प्रधानमंत्री स्वनिधी योजना अशा विविध शासकीय योजनांचा शेकडो लाभार्थ्यांना लाभ मिळवून दिला. लाभार्थ्यांना विविध शासकीय प्रमाणपत्राचे नि:शुल्क वितरण, निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले मोफत काढून देणे, दिव्यांग बांधवांना मदत. महिलांना बचतीसाठी प्रयास अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीची स्थापना, जिल्हाभर श्री. देवराव भोंगळे यांच्या वाढदवसानिमित्त महारक्तदान शिबीर घेऊन विक्रमी ३०२६ दात्यांचे रक्तदान, प्रत्येक महिन्याला शस्त्रक्रियेसाठी नेत्ररुग्णांच्या व विविध आजारांच्या उपचारासाठी तुकडी रवाना, वेकोलिचा लोखंडी पुल दुचाकीच्या रहदारीकरिता सुरु, नकोडा-मुंगोली प्रतिबंधित पुल दुचाकीच्या वाहतुकीसाठी सुरु, सेवानिवृत्त सैनिकांचे निवास करमुक्त करणे, वेकोलि, एसीसी, लॉयड्स मेटल्स, नपच्या वतीने शहरात मोफत पाणी पुरवठा सुरु, सेवा केंद्रतर्फे टँकरने मोफत पाणी पुरवठा करणे, अमराई वार्डातील भूस्खलनग्रस्तांना सहा महिन्याचे घरभाडे तसेच शासकीय भूखंड घरे बांधण्यासाठी उपलब्ध करून देणे, आनंदाचा शिधा वाटप, लाभार्थ्यांना शिधापत्रिका वाटप, शहरात हायमास्ट लाईट, रस्त्याचे सिमेंटीकरण, इलेक्ट्रिक केबल टाकणे, अत्याधुनिक रुग्णवाहीका व शववाहिका उपलब्ध करून देणे, छोटया दुकानदारांना छत्री वाटप, गरजू लोकांना रक्तपुरवठा उपलब्ध करणे अशी अनेक कामे सातत्याने केली जात आहेत.त्यामुळे भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे हे अल्पावधित युवकांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाले. अपघात घडल्यास तत्काळ मदतीसाठी धावून जाणे, कर्करोगग्रस्तांना, अनाथ व विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे अशी कार्यशैली त्यांची आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे आतापर्यंत अनेकांना जीवनदान मिळाले आहे.जिल्हा भाजपच्या सरचिटणीस पदावर विवेक बोढे यांची नियुक्ती झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

# इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथे संत सेवालाल महाराज जयंती साजरी



**वर्धा । प्रतिनिधी**

वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून समाजप्रबोधन करणारे संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे पर्यवेक्षक नितीन कोठे होते व प्रमूख पाहुणे सैनिकी प्रशिक्षण प्रशिक्षक सुभेदार सुनिल मोहोड होते .

सर्वप्रथम संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला माल्यारपण करुण पूजन करण्यात आले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जिवणपथाची महीती सादर केली. सैनिकी प्रशिक्षण प्रशिक्षक सुभेदार महेश अलसापुरकर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या वैज्ञानिक दृष्टी ठेवून समाज प्रबोधन तसेच एक उत्कृष्ठ समाज शिक्षक असल्याचे मार्गदर्शन केले. त्या काळात त्यांनी जानजो, छानंजो, पचच मानजो.म्हणजे प्रतेक व्यक्तीने जाणून घेणे, ते सत्य आहे की नाही याची शहानिशा करणे त्यानंतरच त्यावर विश्वास ठेवणे. हा मोलाचा संदेश संत सेवालाल महाराज यांनी सर्वांना दिला असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचलन तत्व धाबर्डे आभार प्रदर्शन दिलीप चौधरी यांनी केले.

# इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथे वर्ग बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**पुलगाव । प्रतिनिधी**

वर्ग बारावीची परीक्षा आता जवळ आली असून इंडीयन मिलिटरी स्कूल पुलगाव च्या वर्ग बारावीच्या विद्यार्थ्यांना वर्ग अकरावीच्या विद्यार्थ्यांनी निरोप दिला.या समारंभाचे अध्यक्ष कमांडंट कर्नल के एच पाटील तर प्रमुख पाहुणे शाळेचे पर्यवेक्षक नितीन कोठे तसेच सहायक शिक्षक राहुल वानखेडे होते सर्व प्रथम वर्ग १२ च्या सर्व विद्यार्थांना वर्ग ११ वी च्या विद्यार्थ्यांकडून भेट वस्तू देण्यात आल्या.




त्या नंतर वर्ग १२ वी च्या विद्यार्थांनी शाळेत प्रवेश केला तेव्हापासून तर आज पर्यंत चे अनुभव सांगीतले. आम्हला इथे सैनिकी शिक्षण मिळाले तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करुण सैन्यातील विविध पदावर कार्यरत होण्यासाठी शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तयार करण्याचे काम शाळेने केले . त्यानंतर राहुल वानखेडे यांनी विद्यार्थांना सर्वांनी सक्षम विज्ञानाचे विध्यार्थी कसे घडावे याबद्दल मार्गदर्शन केले . प्रमूख पाहुणे पर्यवेक्षक नितीन कोठे यांनी विद्यार्थ्यांना पुढील भविष्यासाठी वर्तणूक आणि वागणूक या संदर्भात मार्गदर्शन केले.कर्नल के एच पाटील यांनी विद्यार्थ्याना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमाचे संचालन साहिल गेडाम व आदर्श खेडकर तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ओम खत्री वर्ग ११ वि च्या विद्यार्थांनी केले कार्यक्रमाला उपस्थित विजय हागे, स्वप्निल जगताप ,अंकुश केंबलं तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाने सर्व विद्यार्थ्यांना पुढील यशसंपदानासाठी आशीर्वाद दिले

# कला व विज्ञान महाविद्यालयात शस्त्र प्रदर्शनी

**पुलगाव । प्रतिनिधी**

कला व विज्ञान महाविद्यालय पुलगाव येथील इतिहास विभागाच्या वतीने इतिहास व संस्कृती अध्ययन केंद्र तसेच स्वराज्य सेवा प्रतिष्ठान द्वारा इतिहासाचे मूक साक्षीदार विदर्भाचे शस्त्रागार या नावाने शिवकालीन शस्त्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन पोलीस उपनिरीक्षक राजू सोनपितरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पोलीस उपनिरीक्षक घनश्याम जाधव तसेच श्याम चिचाटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास हाडगे होते. याप्रसंगी मंचावर महाविद्यालयाचे आहे आयक्यूएसी समन्वयक डॉ अशोक दवंडे, स्वराज्य सेवा प्रतिष्ठान चांदुर बाजारचे अध्यक्ष शिवा काळे तसेच इतिहास विभाग प्रमुख आणि कार्यक्रमाचे आयोजक डॉ संदीप हातेवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ संदीप हातेवार यांनी केले तर आभार डॉ. योगेश बनगीनवार यांनी मानले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रा. काशिनाथ तरासे यांनी केले.



या पुलगाव नाचनगाव परिसरातील शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि नागरिकांमध्ये शिवकालीन शस्त्रांबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. परिसरात अशा प्रकारच्या प्रदर्शनीचे आयोजन पहिल्यांदाच होत असल्याने सर्वांमध्ये अशा प्रदर्शनीबाबत उत्सुकता होती. परिणामी पहिल्याच दिवशी विविध शाळा आणि महाविद्यालयातील शेकडो विद्यार्थी व असंख्य नागरिकांनी या प्रदर्शनीला भेट दिली. ही प्रदर्शनी बघण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर जी भोयर हे विशेष करून वर्धेवरून देऊन आले होते. या प्रदर्शनी मध्ये जवळपास ५०० वर्षांपूर्वीची शस्त्रे ज्यात तलवारी, ढाल, भाले, बिचवे, तोफ गोळे, दांडपट्टे, चिलखत, शिरस्त्राण ई. ठेवण्यात आले आहे. स्वराज्य सेवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष शिवा काळे हे शस्त्र संग्राहक असून त्यांचे नेतृत्वात सुबोध आणि यश यांनी महत्त्वाचे कार्य केले. अशा प्रकारची प्रदर्शनी बघण्यासाठी लोकांना विविध संग्रहालय छानावी लागतात, कधी पुणे-मुंबईला जावे लागते.परंतु शस्त्र संग्राहक शिवा काळे आणि इतिहास व संस्कृती विभागाचे डॉ .संदीप हातेवार यांच्या प्रयत्नाने या प्रदर्शनीचा लाभ पुलगाव व नाचणगाव येथील जनतेला घेता आला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .